स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या

मानव्य विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील

पीएच. डी (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधन विषय

"सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत बुलडाणा जिल्ह्यातील दिव्यांग विध्यार्थ्यांचा आर्थिक दृष्टीकोनातून केलेला चिकित्सक अभ्यास"

संशोधक

उद्धव रामराव चव्हाण

(एम.ए.अर्थाशास्र, बी.एड.स्पेशल एज्यूकेशन)

मार्गदर्शक

डॉ. जयवंत सदाशिवराव भोयर,

प्राचार्य तथा संशोधक मार्गदर्शक,

कै.बाबुराव पाटील, कला ओ विज्ञान महाविद्यालय, हिंगोली.

संशोधन केंद्र

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ संकुल,नांदेड.

सप्टेबर २०२२

"सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत बुलडाणा जिल्ह्यातील दिव्यांग विध्यार्थ्यांचा आर्थिक दृष्टीकोनातून केलेला चिकित्सक अभ्यास"

१) प्रस्तावना

भारतीय राज्यघटनेच्या 45 व्या कलमांमध्ये 14 वर्ष वयोगट पर्यंतच्या प्रत्येक बालकासाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे, मोफत व सार्वजनिक अशा स्वरूपात देण्याची व्यवस्था मार्गदर्शक तत्वे म्हणून नमूद केली आहे. अशा प्रकारच्या अनेक उपाययोजना करूनही दिव्यांग मुल हि शिक्षणाच्या प्रवाहाच्या बाहेर होती व ती मुल शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे मुख्य कार्य सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत समावेशित शिक्षण उपक्रम याद्वारे केल्या जात आहे.यामध्ये शासनाने दिव्यांग मुलांच्या प्रमाणात म्हणजे दरडोई ३०००/- रुपये अशी रक्कम मंजूर केली असून तश्या स्वरूपाचा निधी हा प्रत्येक तालुका व जिल्हा पातळीवर दिल्या गेला आहे. तरीपण हि रक्कम (निधी) मुलांच्या प्रमाणात पुरेशी आहे काय आणि याचा खरोखर फायदा बुलढाणा जिल्ह्यातील प्रत्येक दिव्यांग मुलांना मिळतो का याचा अभ्यास करणे आर्थिक दृष्ट्या महत्वाचे वाटते. नव्हते तसेच खरोखरच ० ते १८ वयोगटाच्या प्रत्येक दिव्यांग विद्यार्थ्यांना याचा फायदा मिळतो काय हे पाहणे अपरिहार्य होते.

सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत समावेशित शिक्षण अंतर्गत होणारा खर्च हा जिल्ह्यातील तळागाळापर्यंत पोहोचत असताना त्याबद्दल होणारी प्रतिक्रिया जसे योग्य अयोग्य व त्याचा खरा फायदा दिव्यांग विद्यार्थी घेतात काय ही बाजू पण तेवढीच महत्त्वाची ठरते. बुलडाणा जिल्ह्यातील असणारी दिव्यांग विद्यार्थी संख्या आणि त्यावर मंजूर असलेला निधी/सुविधा पुरविल्या जाण्याचे प्रमाण व हे योग्य पद्धतीमध्ये आहे किंवा नाही हे पाहणे उचित ठरते. व म्हणूनच सदर संशोधन आराखड्यामध्ये बुलडाणा जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिक्षण, भविष्य व त्यांचा खर्च तसेच परत मिळणारे त्यांचे हास्य किंवा उत्पन्न जी आपण आर्थिक बाजूने मांडण्याचा प्रयत्न करतो.

आपण देशाला विकासाच्या यशोशिखरावर नेण्याचे स्वप्न पाहत असतो आणि ते स्वप्न सत्यामध्ये येण्याकरिता समाजातील संपूर्ण घटक हे रोजगारी आणि स्वावलंबी असणे आवश्यक आहे. तरच आपल्या स्वप्नाला बळकटी येईल आणि देशाचा विकास होईल. दिव्यांग विद्यार्थी सुद्धा भवीष्यातील सुजाण नागरिक असतात शिवाय त्यांचा सुद्धा देशाच्या उत्पन्न व उत्पादनामध्ये वाटा असतो. आणि म्हणून बुलडाणा जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तीचा सुद्धा सहभाग असणे स्वाभाविक आहे व त्या दृष्टीने पाहिल्यास दिव्यांग विद्यार्थ्यांवर सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत झालेला खर्च आणि त्याचे फलित यामध्ये चिकित्सक पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

दिव्यांग म्हटल्या जाणारी गरजू विद्यार्थी आजच शिक्षणाच्या प्रवाहात आली म्हणजे सर्वच रोजगारीत व कमावते नागरिक बनण्यास उशीर लागणार नाही. व म्हणून सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत समावेशित शिक्षणामध्ये मुलांपर्यंत शाळा, शिक्षक पोहोचविण्याचा प्रयत्न केला

गेला आहे, की ज्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्याला जिल्ह्याच्या किंवा आपले गाव सोडून दूरच्या ठिकाणी शिक्षणाकरिता स्थलांतरित होण्याची गरज राहिली नाही. व त्या मुलांचे सामान्य मुलांतच व सामान्य शाळेत प्रवेश देऊन त्यांच्या दिव्यांग प्रवर्गानुसार विशेष गरजा असणाऱ्या साहित्य/साधनांचा पुरवठा केला जात आहे. ज्यामुळे सर्व दिव्यांग मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातून बाहेर पडणार नाही याची काळजी घेतली गेली आहे. परंतु तरीही यामध्ये सर्व घटक आले की नाही याचा गेल्या काही वर्षातील म्हणजे सण २०१५ ते २०२४ पर्यंतचा बुलडाणा जिल्ह्यातील समावेशित शिक्षणावर झालेला खर्च आणि फलित याचा अभ्यास करून त्यावर उपाययोजनांच्या दृष्टीने प्रकाश टाकण्याचे कार्य याद्वारे करण्याचा प्रयत्न करणार आहे.

2) संशोधनाचे महत्व

भारताच्या सर्वांगीण परिस्थितीचा विचार करता इतर देशाच्या अमेरिका, जपान, फ्रान्स यांच्या तुलनेत दिव्यांग समावेशीत शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. कोणत्याही देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासात सर्व घटकांसाठी शिक्षणाचे महत्त्व अनन्य साधारण आहे.

भारतात सर्व शिक्षा अभियान हे सर्व घटकांसाठी लागू केले पण यामध्ये प्रथम दिव्यांग क्षेत्र म्हणजे विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसंबंधी पाहिजे तेवढ्या प्रमाणात विचार केला गेला नाही. तसेच जो निधी बुलढाणा जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांवर खर्च व्हायला पाहिजे तेवढा पुरेसा आणि त्यांना उपयोगी पडेल अशा पद्धतीचा अवलंब झाला की नाही हे पाहणे पण तेवढेच महत्त्वाचे वाटते. एवढा सारा प्रसार प्रचार करून सुद्धा बुलडाणा जिल्ह्यात शिक्षण घेण्याचे किंवा साक्षरतेचे दिव्यांग विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी आहे किंवा नाही. किंवा कमी असेल तर त्यांचे आर्थिक निकषातून अभ्यास करणे महत्त्वाचे आहे असे वाटते. अति तीव्र स्वरूपाचे दिव्यांगत्व असलेले विद्यार्थी हे खरोखरच प्रवाह मध्ये आहेत की प्रवाह बाहेर गेली आणि त्यांचे पुढे काय झाले. याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. काही दिव्यांग विद्यार्थ्यांना सामान्य शाळेमध्ये प्रवेश मिळत नाही आणि ते विद्यार्थी शाळाबाह्य होतात. त्या मुलांचं काय झालं आणि त्याचा आपल्या अर्थव्यवस्थेमध्ये सहभाग होती की नाही याचे संशोधन होणे गरजेचे आहे.

१) शिक्षणामुळे बुलढाणा जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिक पातळी दर्शवता येते.

२) दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिक्षणामुळे त्यांचा विकास व फायदा दाखवता येतो.

३)संशोधनाची गरज

संशोधन विषयासाठी मी या दिव्यांगत्वाविषयीच्या विषयाची निवड केली. कारण आपण 21व्या शतकात जगत असताना व एक विकासाचे ध्येय व स्वप्न बाळगत असताना आपणाला शिक्षण हा घटक जो फार महत्त्वाचा आहे आणि तो प्रत्येकापर्यंत पोहोचतो की नाही तसेच दिव्यांग क्षेत्राचा विचार करायचा म्हटले तर कितीतरी धोरणे व नियम दिव्यांगांच्या शिक्षणासंदर्भात बनले त्यांचे पालनही झाले. पण त्यांचे फलित काय हे मात्र आज पर्यंत समजू शकले नाही. कारण फलित सामाजिक दृष्ट्या पाहिले गेले, तसेच नैतिक व एक सामाजिक

बांधिलकी यातूनच पाहिले जात होते. पण आजच्या धावपळीच्या व एवढे सारे चांगली विकासाची धोरण राबवत असताना शासनाने सर्व शिक्षा अभियानांतर्गत समावेशित शिक्षण यावर भर देऊन दिव्यांग मुलांना विशेष शिक्षण विशेष शाळेत न देता सामान्य शाळेतच व सामान्य मुलांबरोबरच शिक्षण देण्याचा जो निर्णय घेतला व त्याची अंमलबजावणी सुद्धा सुरू झाली.२०१५ ते २०२४ पर्यंत जी स्थिती व बदल झाले ते पाहणे महत्त्वाचे वाटते. व म्हणून या दिव्यांग मुलांवर होणारा समावेशीत शिक्षणा अंतर्गतचा खर्च पडताळून पाहणे व हा योग्य/ अयोग्य किंवा फलदायी आहे किंवा नाही तसेच हा खर्च पुरेसा आहे किंवा नाही हे पाहणे महत्त्वाचे वाटत असल्याने मी ह्या चिकित्सक आर्थिक बाजूचा विचार करून हा विषय निवडला आहे.

यामद्धे

- ० ते १८ वयोगटाच्या विद्यार्थ्यांवर होणारा खर्च ग्राह्य असून प्रत्यक्ष खर्च सर्व वयोगटावर न होणे.
- सर्व दिव्यांग मुलांना योग्य त्यावेळी साधने न पुरवल्या जाणे.
- सर्व दिव्यांग विद्यार्थी प्रत्यक्षात शिक्षणाच्या प्रवाहात न येणे.
- विशेष गरजा असणाऱ्या मुलांना सर्व शैक्षणिक साधने वैयक्तिक साधने व अपुरे मनुष्यबळ असणे.

४) संशोधन समस्या

"सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत बुलडाणा जिल्ह्यातील दिव्यांग विध्यार्थ्यांचा आर्थिक दृष्टीकोनातून केलेला चिकित्सक अभ्यास"

५) संशोधनाची गृहीतके

कोणत्याही विषयाचे संशोधन करायचे असेल तर त्यासाठी काही बाबी या गृहीत धरावे लागत असतात. सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांचा आर्थिक दृष्टिकोनातून केलेला अभ्यास याचे संशोधन करताना खालील परिस्थिती गृहीत धरली आहे.

१) सर्व शिक्षा अभियानांतर्गत ठरविल्याप्रमाणे जिल्ह्यातील दिव्यांग मुलांवर होणारा दरडोई खर्च अपुरा आहे.

२) बुलढाणा जिल्ह्यातील सर्व दिव्यांग मुलांना दरडोई समान वाटप होत नाही.

३) जिल्ह्यातील दिव्यांग मुलांवर होणाऱ्या खर्चाचा विनियोग अकार्यक्षम होत आहे.

४) बुलढाणा जिल्ह्यातील दिव्यांग मुलांवर होणाऱ्या खर्चापेक्षा त्यापासून मिळणारे उत्पन्न अधिक.

५) विशेष गरजा असणाऱ्या मुलांना दिल्या जाणाऱ्या सुविधांचे समान वाटप होत नाही.

६) बुलढाणा जिल्ह्यातील सण २०१५ ते २०२४ पर्यंत दिव्यांग विद्यार्थ्यांवर झालेला खर्च आणि त्याचे फलित आर्थिक दृष्टिकोनातून पाहिल्या जाईल.

७) सर्व शिक्षा अभियानांतर्गत ठरविल्याप्रमाणे ६-१८ वयोगटातील सर्व दिव्यांग मुलं शाळेत दाखल झाली आहेत किंवा नाही.

६) संशोधनाची उद्दिष्टे

कोणत्याही विषयाचे संशोधन व अभ्यास करायचा असेल तर त्याची काही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवली आहेत.

१) बुलढाणा जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा स्तर अभ्यासणे.

२) ६-१८ वयोगटातील शाळेत जाणारी मुले सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत समावेशित शिक्षणामधून मिळणाऱ्या सवलतीचा, सुविधांचा लाभ घेतात का ते अभ्यासणे आणि त्याचा आर्थिक दृष्टिकोनातून किती फायदा झाला ते पाहणे.

३) बुलढाणा जिल्ह्यातील दिव्यांगांवर केल्या जाणाऱ्या योजनांच्या आर्थिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे.

४) दिव्यांगांवर खर्च होताना त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा अभ्यास करणे.

५) जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांवर होणारा खर्च हा पुरेसा आहे का याचा अभ्यास करणे.

६) जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थी सामान्य शाळेद्वारे शिक्षणाच्या प्रवाहात आले का ते पाहणे.

७) समाज व पालक जागृती झाली किंवा नाही ते पाहणे.

८) सामान्य शिक्षकांची दिव्यांग मुलांसंदर्भात भूमिका पाहणे.

९) सर्व शिक्षा अभियान अंतर्गत या योजनांचा गरजू असणाऱ्या मुलांनी फायदा घेतला आहे का हे पाहणे.

१०) जिल्ह्यातील सामान्य शिक्षक व विशेष शिक्षक यांच्याद्वारे मुलं घडविण्यास काही अडचणी येतात का हे पाहणे.

७) संशोधनाची परिकल्पना

सदर विषयाचा चिकित्सक अभ्यास करीत असताना संशोधनाची परिकल्पना खालील प्रमाणे असेल.

१) बुलढाणा जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थी सर्व शिक्षा अभियान समाची शिक्षण उपक्रमांतर्गत शिक्षण घेत आहे.

२) जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांना सेवा सुविधांचा लाभ मिळाला आहे.

३) सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांपर्यंत सर्व शिक्षा अभियानामुळे शिक्षण पोहोचले तसेच शिक्षक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले आहेत किंवा नाही हे अभ्यासणे.

४) बुलढाणा जिल्ह्यातील समावेशित शिक्षण सर्व शिक्षा अभियान मुळे आर्थिक विकास झाला आहे किंवा नाही याचाही अभ्यास करणे.

५) सर्व शिक्षा अभियानामुळे जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थी शिक्षित झाल्यामुळे आर्थिक विकासात मदत करीत आहेत का याचा अभ्यास करणे.

६) सर्व शिक्षा अभियान मुळे दिव्यांग विद्यार्थी स्वावलंबी झाले आहेत का ते पाहणे.

८) संशोधनाची व्याप्ती

अ) क्षेत्र व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र केवळ बुलडाणा जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांचा झालेला शैक्षणिक व आर्थिक विकास यापुरता मर्यादित असेल.

ब) आशय व्याप्ती :-

दिव्यांग विद्यार्थ्यांचे जीवनात सर्व शिक्षा अभियानामुळे झालेला शैक्षणिक बदल आणि त्यांचा झालेला आर्थिक विकास यापुरतेच व्याप्त असेल.

क) घटक व्याप्ती:-

प्रस्तुत संशोधनामध्ये सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत समरशी शिक्षण उपक्रम मध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांचा झालेला आर्थिक विकास एवढा पुरतेच मर्यादित असेल.

९) संशोधनाची मर्यादा

संशोधन करीत असताना काही मर्यादा येत असतात ज्या मर्यादा आपल्याला मान्य करावे लागतात. त्या मर्यादा खालील प्रमाणे आहेत.

१)विश्वासार्हता :-

हा प्राथमिक स्रोत व दुय्यम श्रोताच्या विश्लेषणावर आधारित असेल त्यामुळे आधीपासूनच असलेली माहिती आणि त्यावर आधारित माहिती मध्ये वापर केला जाईल म्हणजे विश्वासार्हता वाढेल.

2)अचूकता :-

या अभ्यासाच्या परिणाम आणि निष्कर्ष दुय्यम स्रोतांच्या माहिती विश्वासार्हता आणि निवडलेल्या नमुन्यावरील मर्यादा आणि विचारात घेतलेला कालावधीमुळे अचूक होणार नाहीत.

३)कालावधी:-

"सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांचा आर्थिक दृष्टिकोनातून केलेला चिकित्सक अभ्यास" या विषयाचे संशोधन करीत असताना बुलढाणा जिल्ह्यातील १३ तालुक्यांमध्ये प्रत्येकी ५० या प्रमाणात ६५० नमुन्याचा अभ्यास करताना २०१५ ते २०२४ या दहा वर्षाचा कालावधी विचारात घेतला जाईल आणि २०२३-२४ या कालावधीमध्ये पूर्ण केला जाईल.

४)घटक मर्यादा:-

संशोधन करीत असताना बुलढाणा जिल्हा विचारात घेतला आहे त्यामध्ये सर्व शिक्षा अभियानांतर्गत जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थी पुरताच विचारात घेतला आहे.

९)भौगोलिक मर्यादा:-

वरील मर्यादा लक्षात घेता संशोधकांनी बुलढाणा जिल्ह्याची निवड केली आहे त्यामध्ये 13 पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या दिव्यांच्या विद्यार्थ्यांचा चिकित्सक अभ्यास समाविष्ट असेल.

१०) संशोधन पद्धती

"सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांचा आर्थिक दृष्टिकोनातून केलेला चिकित्सक अभ्यास" या विषयावर संशोधन करीत असताना दोन प्रकारच्या तथ्यांचा उपयोग / वापर करून माहिती संकलित करणार.

तथ्यांचे दोन प्रकार-

१) प्राथमिक तथ्ये (Primary Data)
२) द्वितीयक तथ्ये (Secondary Data)

१)प्राथमिक तथ्ये (Primary Data)

संशोधनाच्या या विषयासाठी प्राथमिक तथ्य संशोधन पद्धतीचा वापर करता येईल प्राथमिक तथ्य म्हणजे प्रथम निरीक्षण अथवा स्वतः अध्ययन क्षेत्रात जाऊन त्याविषयी किंवा समस्येच्या संबंधात इतर व्यक्तीकडून मुलाखत, अनुसूची किंवा प्रश्नावलीच्या सहाय्याने, प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे जी माहिती व तथ्य संशोधनकर्ता प्रत्यक्ष जमा करतो त्याच प्राथमिक तथ्य म्हणतात.

अ)निरीक्षण:-

यामध्ये संशोधनकर्ता संशोधन क्षेत्रात जाऊन आपल्या विषयाच्या संबंधित घटना, वास्तू व व्यवहाराचे स्वतः निरीक्षण करून तथ्यांचे संकलन करतो. उदा. समुदायाची राहणी, भाषा, उत्सव, सन, रुधी, परंपरा इत्यादी.

ब) प्रश्नावली:-

संशोधन करता संबंधित विषयाची प्रश्नावली तयार करून उत्तरदात्यांची संपर्क साधून महत्त्वपूर्ण तथ्य गोळा करण्यासाठी याचा उपयोग होतो.

क) मुलाखत:-

संशोधन विषयाच्या संबंधित व्यक्तींना स्वतः भेटून त्यांच्याशी चर्चा करून संशोधन करता महत्त्वाची तथ्य प्राप्त करतो. उदा. सामाजिक प्रथा, प्रक्रिया, परंपरा इ.

ड) अनुसूची :-

अनुसूची द्वारे अशिक्षित उत्तरदात्याकडून माहिती गोळा करणे.

2) द्वितीयक तथ्ये (Secondary Data)

संशोधनाच्या विषयाची प्राथमिक तथ्य बरोबर द्वितीय तथ्य या संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे द्वितीय तथ्य म्हणजे ज्यामध्ये प्रकाशित प्रलेख, अहवाल, सांख्यिकी, दैनंदिनी, वृत्तपत्रे, मासिके इ. मार्फत माहिती प्राप्त होते. द्वितीयक स्त्रोतांमध्ये

१)सर्व शिक्षा अभियान पुस्तिका.

2) अपंग समस्या शिक्षण पुस्तिका.

३) बुलढाणा जिल्हा परिषदेचा सर्व शिक्षा अभियान चे AWP & B बजेट.

४) शासनाचे दिव्यांग विद्यार्थ्याविषयीचे निघालेले परिपत्रके.

५) युनिसेफ आणि WHO चे दिव्यांग विद्यार्थी व सर्व शिक्षा अभियान संबंधित अहवाल.

६) जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थी यादी पाहणी करून.

अशा प्रकारच्या प्राथमिक आणि दुय्यम तत्त्वांचा वापर करून देखील "सर्व शिक्षा अभियान अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांचा आर्थिक दृष्टिकोनातून केलेला चिकित्सक अभ्यास" या विषयावर संशोधन करणार.

११) संशोधांची साधने :-

प्रस्तुत संशोधनामध्ये सर्व शिक्षा अभियान समावेशी शिक्षण उपक्रम अंतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांचे झालेला आर्थिक विकास या दृष्टिकोनातून अभ्यास करायचा असल्याने प्रश्नावली तसेच समाजातील दिव्यांग विद्यार्थ्यांची झालेली आर्थिक प्रगती यांची उदाहरणे घेऊन अशा प्रकारच्या साधनाचा उपयोग करण्यात येईल.

१२) संशोधनाचा न्यादर्श :-

प्रस्तुत संशोधन हे “सर्व शिक्षा अभियान अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांचा आर्थिक दृष्टिकोनातून केलेला चिकित्सक अभ्यास” असा असल्याने बुलढाणा जिल्ह्यातील संबंधित वर्षाचे अंदाजपत्रक यांचा वापर करता येईल तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांची आर्थिक प्रगती किंवा झालेला फायदा यशोगाथांच्या वापर करण्यात येईल.

१३) न्यादर्श निवड पद्धती:-

प्रस्तुत संशोधनासाठी आर्थिक विकास पाहणे व प्रश्नावली तसेच सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा उपयोग करण्यात येईल.

१४) सांख्यिकीय परिणाम:-

सदर संशोधनांमध्ये शेकडेवारी संख्यात्मक आकडेवारी तसेच स्तंभालेख वारंवारिता याचा वापर करण्यात येईल.

१५) **संशोधनाची प्रकरण रूपरेषा:-**

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात सर्व शिक्षा अभियान ही संकल्पना स्पष्ट करणे. दिव्यांग विद्यार्थी यांच्या विषयी असलेल्या विविध योजना तसेच भारतातील असलेली दिव्यांग शिक्षणाचा विषयी सरकारची भूमिका याबद्दल विवेचन केल्या जाईल. सर्व शिक्षा अभियानाची उद्दिष्टे, समस्येची मांडणी, व्याप्ती, संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे, गृहीतके, तथ्य संकलनाच्या पद्धती, संशोधनाचा कालावधी इत्यादीचा समावेश या प्रकरणात केला जाईल.

प्रकरण दुसरे - बुलढाणा जिल्ह्याचे पार्श्वभूमी.

प्रस्तुत प्रकरणांमध्ये बुलढाणा जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमीचा समावेश केला जाईल. तसेच बुलढाणा जिल्ह्याचे भौगोलिक स्थान, क्षेत्रफळ, ऐतिहासिक वारसा, लोकसंख्या जीवनमान, आरोग्य, शिक्षण इत्यादींचा समावेश या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण तिसरे - संशोधन साहित्याचा आढावा.

प्रस्तुत विषयाला अनुसरून संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात येईल. यामध्ये सर्व शिक्षा अभियान आणि दिव्यांग विद्यार्थ्यांविषयी व समावेशित शिक्षण उपक्रम यासंबंधी किंवा दृष्टिकोनातून ज्या विचारवंतांनी, संशोधकांनी जो अभ्यास केलेला आहे, तसेच संशोधनात्मक अध्ययनाच्या विचाराचा मागोवा या प्रकरणात घेण्यात येईल.

प्रकरण चौथे - बुलढाणा जिल्ह्यातील समावेशित शिक्षण अंतर्गत आणि सामान्य शिक्षणांतर्गत होणारा दिव्यांग विद्यार्थ्यांवरील खर्चाचा तुलनात्मक अभ्यास.

प्रस्तुत प्रकरणांमध्ये बुलढाणा जिल्ह्यातील सर्व शिक्षा अभियानांतर्गत समावेशित शिक्षण उपक्रम आणि सामान्य शिक्षण अंतर्गत होणारा दिव्यांग विद्यार्थ्यांवरील खर्च, एकूण शाळा व विद्यार्थी संख्या, देण्यात आलेल्या सेवा व सुविधा, दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिक्षणाच्या प्रवाहात येण्याचे प्रमाण, त्याच्या शिक्षणावर झालेला खर्च इत्यादी. सर्व घटकांचे अध्ययन या प्रकरणांमध्ये केले जाईल.

प्रकरण पाचवे - बुलढाणा जिल्ह्यातील सर्व शिक्षा अभियानांतर्गत होणारा दिव्यांग विद्यार्थ्यांवरील खर्चाचा अभ्यास

बुलढाणा जिल्ह्यातील सर्व शिक्षा अभियानांतर्गत समाविष्ट शिक्षणात खर्च अंदाजपत्रक दिव्यांग विद्यार्थ्यांना पुरल्या जाणाऱ्या सुविधा. मुलांवरील दरडोई खर्च. दिव्यांग मुलं व शासनाच्या पुरवल्या जाणार निधीचे प्रमाण. ० ते ६ व ६ ते १८

वयोगटातील दिव्यांग विद्यार्थ्यांवरील खर्च व फायदे. या सर्व बाबींचा अध्ययन प्रकरणात मध्ये केले जाईल.

प्रकरण सहावे - निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संपूर्ण संशोधन कार्यामधून जे निष्कर्ष मिळतील त्या संदर्भातील माहिती आणि सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत बुलढाणा जिल्हयातील दिव्यांग विद्यार्थ्यांचा आर्थिक दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास करताना आलेल्या समस्या, शाळांचे, शिक्षकांना येणाऱ्या अडचणी व त्यावर उपाययोजना सुचविणे. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून आर्थिक तरतूद वाढावी किंवा कमी करावी अशा प्रकारच्या शिफारशी सुचवता येतील. यासंबंधीच्या प्रमुख शिफारशी प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहेत.

१६) संदर्भ सूची :-

१) डॉ.सुप्रिया काळे, २००८ अपंग समावेशित शिक्षण हस्तपुस्तिका : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, जवाहर बाल भवन, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई ४००००४.

२) WHO,Geneva 28-29 Novembar 2000, Report of the informal Consultation on the Economics Analysis of Sensory Disabilities.World Health Organization Prevention of Blindness and Deafness (PBD).

३) डॉ. सुप्रिया काळे, १९९८,कर्णबधीर आणि त्यांचे शिक्षण भाग १ वेदांग प्रकाशन ६७/२ इंद्रायणी फोर्मलंड रामदासपेठ, नागपूर.४४००१०.

४) डॉ. प्रतिभा वीरकर, फेब्रुवारी २००१,कर्णबधिरांचे शिक्षण व शिक्षक, मो.द.नांदुरकर अनमोल प्रकाशन ६८३,बुधवार पेठ, पुणे - ४११००२.

५) समावेशित शिक्षणाची वेबसाईट www.ssampsp.org.

६) जिल्हा परिषद बुलडाणा, बजेट २०१६-१७, सर्व शिक्षा अभियान समावेशित शिक्षण जिल्हा बुलडाणा.

मार्गदर्शक

डॉ. जयवंत सदाशिवराव भोयर,

प्राचार्य तथा संशोधक मार्गदर्शक,

कै.बाबुराव पाटील, कला ओ विज्ञान महाविद्यालय, हिंगोली.

संशोधक

उद्धव रामराव चव्हान